RNI No. MAHBIL/2009/37831
Reg. No MH/MR/South-339/2011-13



महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण भाग चार-ब

वर्ष ४, अंक ९३] गुरुवार, जानेवारी ३, २०१३/पौष १३, शके १९३४ [पृष्ठे १९
किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक २

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

नियोजन विभाग (रोहयो)

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई, दिनांक २ जानेवारी २०१३

अधिसूचना

महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७.

क्रमांक बेभनि. २०१२/प्र.क्र. ३०/रोहयो-१०.—महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ (१९७८ चा महा. २०) याच्या कलम ८ च्या पोट-कलम (८) आणि १७ च्या पोट-कलम (१) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत समर्थन करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून तसेच त्यासंदर्भात करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश किंवा संलेख यांचे अधिक्रमण करून महाराष्ट्र शासनाने करण्याचे प्रस्तावित केलेल्या नियमांचा पुढील मसुदा त्याद्वारे परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींच्या माहितीकरिता, उक्त अधिनियमाच्या कलम १७ च्या पोट-कलम (३) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे. आणि याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, उक्त मसुदा दिनांक १८ जानेवारी २०१३ रोजी किंवा त्यानंतर महाराष्ट्र शासन विचारात घेईल.

२. उक्त मसुद्याबाबत कोणत्याही व्यक्तीकडून ज्या कोणत्याही हरकती वा सूचना प्रधान सचिव (रोहयो), नियोजन विभाग, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ यांच्याकडे उपरोक्त दिनांकापूर्वी येतील त्यांवर शासन विचार करील.

नियमांचा मसुदा

१. **संक्षिप्त नाव**.—(१) या नियमांना महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना महाराष्ट्र बेरोजगार भत्ता नियम, २०१२, असे म्हणावे,

(२) ते **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. **व्याख्या.**—या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,

(क) 'अधिनियम' याचा अर्थ महाराष्ट्र रोजगार हमी अधिनियम, १९७७ असा आहे.

(ख) 'दिवस' याचा अर्थ कामाचा दिवस, असा आहे.

(ग) 'नमुना' याचा अर्थ या नियमांसोबत जोडलेला नमुना.

(घ) 'बेरोजगार भत्ता' याचा अर्थ अधिनियमाच्या कलम ८ च्या पोट-कलम (४) अन्वये बेरोजगार व्यक्तीला द्यावयाचा असा आहे.

(ङ) यामध्ये वापरलेले परंतू यात व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना अधिनियमामध्ये त्यांना यथाक्रम नेमुन दिलेलेच अर्थ असतील.

३. बेरोजगार भत्ता मिळण्याचा हक्क.—

या योजनेअंतर्गत जिची नोंदणी करण्यात आली आहे आणि जिच्याकडे वैध जॉब कार्ड असेल आणि जिने अधिनियमांतर्गत वेतनी रोजगार मिळावा म्हणून ग्रामपंचायतीकडे किंवा कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी यांच्याकडे अर्ज दिलेला असेल आणि असा रोजगार मिळावा म्हणून केलेला अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत जिला रोजगार देण्यात आला नसेल अशी व्यक्ती अधिनियमाच्या कलम ८ च्या पोट-कलम (४) अन्वये राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा दराने व अशा दिवसांकरिता दैनिक बेरोजगार भत्ता मिळण्यास पात्र असेल.

४. बेरोजगार भत्ता मजुरी व अधिदान प्राधिकारी.—

कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी नियम ३ अन्वये देय बेरोजगार भत्ता मंजूर करील व संवितरित करील.

५. बेरोजगार भत्ता प्रदान करण्याबाबतची कार्यपद्धती.—

(क) बेरोजगार भत्त्याची मागणी करणारी व्यक्ती असा भत्ता मागण्यास ती ज्या दिवशी पात्र होईल त्या दिवसानंतर, बेरोजगार भत्त्याची मागणी केलेला या नियमांखालील नमुना क्रमांक १ मधील अर्ज ग्रामपंचायतीकडे करील.

(ख) अधिनियमाखालील नमुना ४ मधील, रोजगार मिळण्याची विनंती करणारा अर्ज देतेवेळी, मिळालेल्या अधिनियमाखालील नमुना क्रमांक ५ मधील पोचपावतीची प्रत उक्त अर्जासोबत जोडण्यात येईल.

(ग) उक्त अर्ज मिळाल्यावर ग्रामपंचायत, आवश्यक ती चौकशी करील आणि या योजनेअंतर्गत अर्जदाराची नोंदणी करण्यात आली आहे व त्याच्याकडे जॉब कार्ड आहे तसेच तो बेरोजगार भत्ता

मिळण्यास हक्कदार आहे याबाबत तिची खात्री पटली असल्यास, ग्राम पंचायत दोन दिवसांच्या आत कार्यक्रम अधिकारी /सह कार्यक्रम अधिकारी यांच्याकडे तिच्या अभिप्रायासह तो अर्ज पाठवील.

(घ) पोट-कलम ५ (ग) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे ग्रामपंचायतीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी आवश्यक ती चौकशी करील आणि जर अर्जदाराची योजनेअंतर्गत रोजगार मिळण्यासाठी नोंदणी झालेली आहे व तो बेरोजगार भत्ता मिळण्यास हक्कदार आहे अशी त्याची खात्री पटली तर, तो ज्या कालावधीकरिता बेरोजगार भत्ता देय असेल तो कालावधी दर्शविणारा नियमाखालील नमुना क्रमांक २ मधील तशा आशयाचा आदेश देईल आणि त्याच्या आदेशानुसार वाजवी वेळेच्या आत बँक किंवा टपाल कार्यालय यामार्फत अर्जदाराच्या खात्यावर पैसे जमा करील.

(च) कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना निधी असोसिएशन (महाराष्ट्र) सोसायटी याच्या खात्यातील राज्य शासनाच्या हिश्श्यातून आवश्यक तो खर्च भागवील आणि एम आय एस मध्ये नोंद करील. जर कार्यक्रम अधिका-याने अथवा सह कार्यक्रम अधिका-याने बेरोजगार भत्त्याची केलेली मागणी फेटाळली तर तो ती मागणी फेटाळण्यामागील कारणे नमूद करील आणि या नियमांखालील नमुना क्रमांक ३ मध्ये याबाबत अर्जदाराला कळवील. कार्यक्रम अधिकारी अथवा सह कार्यक्रम अधिकारी शक्य असेल तेथवर बेरोजगार भत्ता मिळण्यासाठीचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून दहा दिवसांच्या आत त्या अर्जावर निर्णय देईल.

६. ग्राम पंचायतीची जबाबदारी.—

(क) ग्रामपंचायत जर अर्जदाराचा अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत अर्जदारास रोजगार देऊ शकत नसेल तर ती, ही बाब पुरेशी अगोदर सह कार्यक्रम अधिकाऱ्याच्या किंवा कार्यक्रम अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देईल, जेणेकरुन कार्यक्रम अधिकाऱ्याला किंवा सह कार्यक्रम अधिकाऱ्याला पर्यायी व्यवस्था करणे शक्य होईल.

(ख) बेरोजगार भत्ता मिळण्यासाठीचा अर्ज मिळाल्यानंतर ग्रामपंचायत, अर्जदाराच्या बेरोजगारचा पुरावा म्हणून त्या प्रयोजनाकरिता ठेवलेल्या नोंदवहीमध्ये किंवा पटामध्ये अर्जदारास आपली दैनिक हजेरी लावण्याची अनुमती देईल.

७. ग्रामपंचायतीने अर्ज स्वीकारणे,इत्यादींबाबत कसूर केल्यास त्यावरील कार्यपद्धती.—

(क) अर्जदारास ग्राम पंचायतीने अधिनियमांतर्गत बेरोजगार भत्ता मिळण्यासाठीचा आपला अर्ज विचारार्थ स्वीकारण्यास नकार दिलेला आहे किंवा रोजगार मिळण्यासाठीच्या आपल्या मूळ अर्जास पोच दिलेली नाही याबद्दलचा पुरेसा पुरावा सोबत जोडून थेट कार्यक्रम अधिकाऱ्याकडे किंवा सह कार्यक्रम अधिका-याकडे आपला अर्ज सादर करता येईल.

(ख) असा अर्ज मिळाल्यावर, कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी, तो अर्ज ग्रामपंचायतीमार्फत पाठविण्यात आलेला नसला तरी यथायोग्य चौकशी करून व खात्री करून नियम ५ (घ) अनुसार तरतूद केल्याप्रमाणे योग्य ते आदेश देईल.

८. बेरोजगार भत्ता देणे बंद करणे.—

(क) अर्जदारास ग्रामपंचायतीने किंवा कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी याने कामावर उपस्थित राहण्याचे निर्देश दिल्यावर,

(ख) ज्या कालावधीकरिता रोजगाराची मागणी करण्यात आली असेल तो कालावधी समाप्त झाल्यावर, राज्य शासनाचे बेरोजगार भत्ता देण्याचे दायित्व संपुष्टात येईल.

९. बेरोजगार भत्ता मागण्यास अपात्र ठरणे.—

(१) पाऊस किंवा असामान्य नैसर्गिक आपत्तीसारख्या मानवी नियंत्रणापलीकडील परिस्थितीमुळे जर राज्य शासनास रोजगार पुरविणे शक्य नसेल (म्हणजेच कार्यक्रम अधिकारी किंवा सह कार्यक्रम अधिकारी यांस रोजगार मागणा-या व्यक्तीला कामाचा आदेश असणारे पत्र देणे शक्य नसेल अथवा अंमलबजावणी अभिकरणास कार्यक्रम अधिका-याने / सह कार्यक्रम अधिका-याने निर्देशित केलेल्या व्यक्तींना कामावर सामावून घेणे किंवा काम हाती घेणे किंवा काम चालू करणे शक्य नसेल) तर राज्य शासनावर बेरोजगार भत्ता प्रदान करण्याचे कोणतेही दायित्व असणार नाही.

(२) एखादा अर्जदार, जो,—

(क) त्याला देण्यात आलेला रोजगार स्वीकारणार नाही,

(ख) कार्यक्रम अधिका-याने / सह कार्यक्रम अधिका-याने अथवा अंमलबजावणी अभिकरणाने त्याला कामावर उपस्थित राहण्याबाबत अधिसूचित केल्याच्या ७ दिवसांच्या आत कामावर उपस्थित राहणार नाही.

(ग) एका आठवडयापेक्षा अधिक काळ , संबंधित अंमलबजावणी प्राधिकरणाची परवानगी न घेता कामावर सतत गैरहजर राहत असेल किंवा,

(घ) एका महिन्यात, एकूण एका आठवडयापेक्षा अधिक काळ गैरहजर राहत असेल तर,

(ड) या नियमांखालील आवश्यक असलेल्या पात्रता अटींची पूर्तता करत नसेल तर अधिनियमाखाली देय असलेल्या बेरोजगार भत्त्याची मागणी करण्यास पात्र असणार नाही.

(३) एखादया व्यक्तीने , आगोदरच रोजगार मिळालेला असतांना, बेरोजगार भत्त्यासाठी मागणी केली असेल व तो स्वीकारल्याचे आढळून आले तर ती व्यक्ती , ज्या दिवशी तिने बेरोजगार भत्त्यासाठी मागणी केल्याचे व तो स्वीकारल्याचे आढळून आले असेल त्या शेवटच्या दिवसापासून ३ महिन्यांच्या कालावधीसाठी बेरोजगार भत्ता मिळण्यास हक्कदार असणार नाही.

१०. विवक्षित परिस्थितीत बेरोजगार भत्त्याचे संवितरण न करणे.

(१) कार्यक्रम अधिकारी / संयुक्त कार्यक्रम अधिकारी , त्यांच्या नियंत्रणात नसलेल्या कोणत्याही कारणामुळे बेरोजगार भत्त्याचे वेळेवर किंवा काहीच वितरण करण्याच्या स्थितीत नसेल तर, तो, जिल्हा कार्यक्रम समन्वयकाला ही बाब कळवील आणि त्याच्या व ग्रामपंचायतीच्या सूचना फलकावर आणि त्याला योग्य वाटेल अशा इतर ठळक जागी लावावयाच्या नोटिशीमध्ये अशी कारणे घोषित करील.

(२) जिल्हा कार्यक्रम समन्वयकाने अशी प्रकरणे राज्य शासनाला कळविली पाहिजेत आणि राज्य शासन शक्य तितक्या लवकर, बेरोजगार भत्ता प्रदान करण्यासाठी सर्व उपाययोजना करील.

११. वार्षिक अहवाल

राज्य शासनाला , बेरोजगार भत्त्याची एम आय एस व वार्षिक अहवाल विहीत करता येईल आणि महाराष्ट्र रोजगार हमी परिषदेच्या वार्षिक अहवालात बेरोजगार भत्त्याचे अहवाल समाविष्ट करण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करता येतील.

नमुना क्रमांक १

(नियम ५ पहा)

रोजगार हमी योजनेखाली बेरोजगार भत्त्यासाठी करावयाचा अर्ज

(१) नाव .. .. ..

(२) पत्ता .. .. ..

(३) पुरुष/स्त्री .. .. ..

(४) वय .. .. ..

(५) नोंदणी कमांक .. .. ..

(६) नोंदणीचा दिनांक .. .. ..

(७) रोजगारासाठी अर्ज कोणत्या तारखेस व कोणास दिला.

(८) किती दिवसांसाठी बेरोजगार भत्त्याची मागणी केली आहे.

(९) बेरोजगार भत्त्याच्या मागणीच्या कालावधीच्या प्रारंभाची तारीख.

मी, ———— राहणार ———— गांभीर्यपूर्वक असे जाहीर करतो की, या अर्जाद्वारे ज्या कालावधीसाठी मी बेरोजगार भत्त्याची मागणी केली आहे त्या कालावधीत मी कोठेही रोजगारावर नव्हतो. आणि याद्वारे अशी हमी देतो की, उपरोक्त कालावधीत किंवा त्यापैकी काही काळात मी रोजगारांवर होतो असे सिद्ध झाल्यास त्या कालावधीसाठी मिळालेले बेरोजगार भत्त्याची रक्कम शासनास परत करीन.

दिनांक ..... अर्जदाराची सही/अंगठयाची निशाणी.

नमुना क्रमांक २

(नियम ५ पहा)

रोजगार हमी योजनेखाली बेरोजगार भत्ता मंजुरीचे आदेश

क्रमांक

प्रति

नोंदणी प्राधिकारी,

गाव .....

पंचायत समिती .....

..... गावातील रहिवाशी श्री./श्रीमती/कुमारी .....

..... (नोंदणी क्रमांक .....)

यांस दिनांक ..... पासून .....

पर्यंतच्या कालावधीकरिता बेरोजगार भत्ता म्हणून ..... रुपये

(अक्षरी रुपये .....फक्त) देण्यास मंजुरी देण्यात येत आहे.

ठिकाण : ..... कार्यक्रम अधिकारी/सह कार्यक्रम अधिका-याची स्वाक्षरी.

दिनांक : ..... तहसील/ पंचायत समिती .....

प्रत -

श्री./श्रीमती/कुमारी .....राहणार .....यांस त्यांच्या बेरोजगार भत्त्याविषयीच्या दिनांक .....च्या अर्जाच्या संदर्भात अग्रेषित.

नमुना क्र. ३

(नियम ५ पहा)

रोजगार हमी योजनेखाली बेरोजगार भत्ता अर्ज नामंजूर केल्याबाबतची सूचना.

प्रति,

श्री./श्रीमती/कुमारी .....

नोंदणी क्रमांक .....

गाव .....

पंचायत समिती .....

संदर्भ. - आपला दिनांक ..... चा बेरोजगार भत्त्यासंबंधीचा अर्ज.

खाली नमूद केलेल्या कारणांमुळे दिनांक ..... पासून ..... पर्यंतच्या कालावधीकरिता बेरोजगार भत्त्यासाठी केलेली आपली मागणी नामंजूर करण्यात येत आहे. :

.....

.....

.....

ठिकाण : .....

दिनांक : .....

कार्यक्रम अधिकारी /सह कार्यक्रम अधिकाऱ्याची स्वाक्षरी

तहसील/पंचायत समिती, ...

नमुना क्र. ४

रोजगार हमी योजनेखाली बेरोजगार भत्त्याच्या वाटपाची नोंदवही

अ. क्र.	रोजगार मागणाऱ्याचे नाव	नोंदणी क्रमांक	बेरोजगार भत्ता मंजुर केलेल्या आदेशाचा क्रमांक व दिनांक	मंजुर केलेल्या बेरोजगार भत्त्याचा कालावधी	रक्कम	भत्ता दिल्याचा दिनांक	भत्ता घेणाऱ्याची सही	साक्षीदाराचे नाव व सही	अधिकाऱ्याची सही
(१)	(२)	(३)	(४)	(५)	(६)	(७)	(८)	(९)	(१०)

नमुना क. ५

(नियम १० पहा)

रोजगार हमी योजनेखाली वितरण केलेल्या बेरोजगार भत्त्याचे मासिक विवरणपत्र..... महिन्यांसाठी.

(१) कार्यक्रम अधिकारी /सह कार्यक्रम अधिकाऱ्याकडून बेरोजगार भत्ता संवितरणासाठी मिळालेल्या रकमेतून या महिन्याच्या सुरुवातीची शिल्लक ..... रु. .....

(२) या महिन्यात मिळालेली रक्कम .. .. रु. .....

(३) एकूण .. .. रु. .....

(४) या महिन्यात केलेल्या संवितरणाची संख्या .. .. रु. .....

(५) या महिन्यात संवितरण केलेली रक्कम .. .. रु. .....

(६) या महिना अखेरची शिल्लक (३ उणे ५) .. .. रु. .....

ठिकाण : .....

दिनांक : .....

नोंदणी प्राधिकाऱ्याची सही.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

व्ही. गिरीराज,

शासनाचे प्रधान सचिव (रोहयो).

PLANNING DEPARTMENT

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk

Mantralaya, Mumbai 400 032, dated 2nd January 2013

NOTIFICATION

MAHARASHTRA EMPLOYMENT GUARANTEE ACT,1977.

No. UAR.2012/CR.30/EGS-10.—The following draft of rules which the Government of Maharashtra proposes to make in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 17 read with sub-section (*8*)of the Maharashtra Employment Guarantee Act,1977 (Mah.XX of 1978) and of all other powers enabling it in this behalf and in supersession of all existing rules, orders or instruments made in this behalf, is hereby published, as required by sub-section *(3)* of section 17, of the said Act for the information of all persons likely to be affected thereby; and notice is hereby given that the said draft will be taken into consideration by the Government of Maharashtra on or after the 18th day of January 2013.

2. Any objections or suggestions which may be received by the Principal Secretary, (EGS), Planning Department, Mantralaya, Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai- 400 032, from any person with respect to the said draft rules,before the aforesaid date will be considered by the Government.

DRAFT RULES

1. **Short Title.**—(i) These rules may be called as Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme–Maharashtra Unemployment Allowance Rules, 2012.

(ii) They shall come into force on the date of their publication in the Official Gazette.

2. **Definitions.**—In these rules, unless the context otherwise requires :

(*i*) 'Act' means the Maharashtra Employment Guarantee Act, 1977 ;

(*ii*) 'Day' means working day ;

(*iii*) "Form" means a Form appended to these rules ;

(*iv*) "unemployment allowance" means a allowance to be paid to an unemployed person under sub-section (4) of section 8 of the Act ;

(*v*) words and expressions used but not defined in these rules shall have the meanings respectively assigned to them in the Act.

3. **Entitlement to receive Unemployment Allowance.**—A person who is registered and having a valid job card under the scheme and who

has given an application to Gram Panchayat or the Programme Officer or Joint Programme Officer asking for wage employment under the Act and is not provided employment within fifteen days of receipt of the application seeking employment then that person shall be entitled to a daily unemployment allowance at such rate and for days as is specified by the State Government by notification , under sub-section (*4*) of section 8 of the Act.

4. Authority for sanctioning and paying the Unemployment Allowance.—The unemployment allowance payable such unemployed person under rule 3, shall be sanctioned and disbursed by the Programme Officer or Joint Programme Officer.

5. Procedure for Payment of Unemployment Allowance.—

(*i*) A person claiming unemployment allowance shall make an application Form No.1under these rules to the Gram Panchayat seeking unemployment allowance on the day after he becomes eligible for claiming such allowance ;

(*ii*) A copy of the acknowledgement in Form No.5 under the Act received while handling over the application seeking employment Form.4 under the Act shall be attached to the said application ;

(*iii*) The Gram Panchayat on receipt of the said application shall make necessary enquiries and if satisfied that the applicant is registered under the scheme and has job card and is entitled for payment of unemployment allowance he shall forward within two days the application to the Programme Officer or Joint Programme Officer along with his remarks ;

(*iv*) On receipt of the report from the Gram Panchyat as provided in sub-section 5(*3*) Programme Officer or Joint Programme Officer shall make necessary enquiries and if he is satisfied that applicant is registered for employment under the Scheme and is entitled for payment of unemployment allowance, he shall issue an order to that effect in Form No.2 under the rule indicating the period for which the unemployment allowance is payable and shall make payment, as per his order, through bank or post office to the account of the applicant in reasonable time ;

(*v*) The Programme Officer or Joint Programme Officer will meet the required expenses from the State Government share in account of Mahatma Gandhi National Rural Employment Guarantee Scheme Fund Association (Maharashtra) Society and make entry in MIS. If the Programme Office or Joint Programme Officer rejects the demand for unemployment allowance, he shall record the reason for rejecting the

same and intimate the applicant in Form No.3 under the rules. As far as possible, the Programme Officer or Joint Programme Officer shall decide the application for unemployment allowance within ten days of its receipt.

6. Responsibility of Gram Panchayat.—

(*i*) The Gram Panchayat shall bring to notice of the Joint Programme Officer or the Programme Officer, sufficiently in advance, if it is not in a position to provide employment to the applicant within fifteen days of his or her application, so as to enable the Programme Officer or Joint Programme Officer to make alternate arrangements;

(*ii*) On receipt of the application for unemployment allowance the Gram Panchayat shall allow the applicant to record his daily attendance in a register or sheet opened for that purpose as evidence of his unemployment.

7. Procedure on failure of Gram Panchayat to accept application etc.—

(*i*) An applicant may submit his application to the Programme Officer or Joint Programme Officer directly, along with sufficient evidence that the Gram Panchayat has refused to entertain his application for unemployment allowance or not acknowledged his original application for employment under the Act;

(*ii*) On receipt of such application the Programme Officer or Joint Programme Officer after due enquiry and satisfaction pass suitable orders as provided under Rule 5(*d*) notwithstanding the fact that the application has not been routed through the Gram Panchayat.

8. Cesation of unemployment allowance.—

(*i*) The liability of the State Government to pay unemployment allowance will cease as soon as :—

(*a*) The applicant is directed by Gram Panchayat or Programme Officer or Joint Programme Officer to report for work.

(*b*) The period for which employment is sought comes to an end

9. Ineligibility for claiming unemployment allowance

(*i*) If, owing to circumstances beyond human control like rains or unusual natural calamities, the State Government is unable to provide employment (i.e. the Programme Officer or Joint Programme Officer being unable to issue the letter directing the employment seeker to a work or the Implementing agency being unable to absorb the persons

directed by the Programme Officer or Joint Programme Officer or to take up or continue the work) there shall be no liability on the part of the State Government to pay unemployment allowance.

(*ii*) An applicant who-

(*a*) does not accept the employment provided to him,

(*b*) does not report for the work within seven days of being notified by the Programme Officer or Joint Programme Officer or implementing agency to report for the work,

(*c*) continuously remains absent from work, without obtaining a permission from the concerned implementing agency for a period of more than one week or

(*d*) remains absent for a total period of more than one week in a month, shall not be eligible to claim the unemployment allowance payable under the Act.

(*e*) does not fulfill the eligibility conditions require under this rule.

(*iii*) A person who is found to have claimed and accepted unemployment allowance while already having an employment will not be entitled to unemployment allowance for a period of 3 months from the last day on which he is so found to have claimed and accepted unemployment allowance.

10. Non disbursement of Unemployment Allowance in certain circumstances.—

(*i*) If the Programme Officer or Joint Programme Officer is not in a position to disburse the unemployment allowance in time or at all for any reason beyond his control, he shall report the matter to the District Programme Co-ordinator and announce such reasons in a notice to be displayed of his and Gram Panchayat notice board and other conspicuous places as he may deem necessary.

(*ii*) The District Programme Co-ordinator shall report such cases to the State Government and the State Government shall take all measures to make payment of unemployment allowance as expeditiously as possible.

11. Annual Report.—

The State Government may prescribe the MIS and the annual report of unemployment allowance and take necessary steps to incorporate unemployment allowance reports in the annual report of Maharashtra Employment Guarantee Council.

FORM NO. 1

(*See* Rule 5)

Application for unemployment allowance under the Employment Guarantee Scheme

1. Name ..
2. Address ..
3. Sex ..
4. Age ..
5. Registration No.
6. Date of Registration
7. Date on which application for employment was handed over and to whom it was handed over
8. No. of days for which unemployment allowance is claimed.
9. Date of the beginning of the period for which unemployment allowance is claimed.

I..... resident of ..... hereby declare solemnly that I was not employed anywhere for the period for which I am claiming unemployment allowance in this application and hereby undertake to refund to Government the amount of unemployment allowance received for the that period , if it is proved subsequently that I was employed during that period or a portion thereof.

Date : .....

Signature/Thumb impression of applicant.

FORM NO. 2

(*See* Rule)

Order sanctioning unemployment allowance under the Employment Guarantee Scheme

No.....

To

Registering Authority,
Village.....
Panchayat Samiti.....

Sanction is accorded to the payment of unemployment allowance amounting

Rs.....(Rs.....only) to Shri/Shrimati/Kumari.....Registration No.....) Resident of village .....for the period from.....to .....

Place : .....
Date : .....

Signature of
Programme Officer/Jt. programme Officer

Panchayat Samiti/Tahsil .....

Copy to Shri/Smt./Kumari..... Village.....with reference to his/her application,.....dated.....for unemployment allowance

FORM NO. 3

(*See* Rule 5)

Intimation regarding rejection of application for unemployment allowance under the Employment Guarantee Scheme

To

Shri/Smt./Kumari.....

Registration No. .....

Village .....

Panchayat Samiti .....

Reference :- Your application dated ..... for unemployment allowance.

Your claim for unemployment allowance for the period from.....to.....is rejected for the following reason :-

.....

.....

Place : .....

Signature of

Programme Officer/Jt. Programme Officer,

Date : .....

Panchayat Samiti/Tahsil.

FORM NO. 4

Register of disbursement of unemployment allowance under the Employment Guarantee Scheme

Sr. No.	Name of the employment seeker	Registration No.	No. and date of order sanctioning unemployment allowance	Period for which sanctioned	Amount	Date of payment	Signature of recipient	Name and Signature of witness	Signature of Registering Authority
(1)	(2)	(3)	(4)	(5)	(6)	(7)	(8)	(9)	(10)

FORM NO. 5

(*See* Rule)

Monthly statement of disbursement of unemployment allowance under the employment guarantee Scheme for the month of .....

1. Balance amount at the beginning of the month out of the amount received from the Programme officer/Jt. Programme Officer for disbursement of unemployment allowance. Rs.....
2. Amount received during the month. Rs.....
3. Total .. .. .. Rs.....

4. No. of disbursements made during the month. Rs.....
5. Amount disbursed during the month Rs.....
6. Balance at the end of the month (3 minus 5) Rs.....

Place : .....

Date : ..... Signature of Registering Authority

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. GIRIRAJ,
Principal Secretary (EGS) to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.